# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक-27.06.2026 वार- शनिवार

---

**ठाकूर**

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकूर यांनी शेतकऱ्यांनी रासायनिक खतांचा वापर कमी करून नैसर्गिक शेतीचा अवलंब करावा, असं आवाहन केलं आहे. बारामती येथे 'खेत बचाओ अभियान' अंतर्गत आयोजित शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. कृषी विज्ञान केंद्र, बारामती येथे त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित ऊस आणि केळी पिकांच्या प्रकल्पांची तसेच मायक्रोसॉफ्टच्या सहकार्याने उभारलेल्या AI केंद्राची पाहणी केली. नैसर्गिक शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या 'जीवामृत' निर्मिती आणि वापराबाबतही त्यांनी माहिती घेत कृषी विज्ञान केंद्राच्या कार्याचं कौतुक केलं. नैसर्गिक शेतीमुळे जमिनीचं आरोग्य सुधारतं, उत्पादनक्षमता वाढते आणि सुरक्षित, पौष्टिक अन्ननिर्मितीला चालना मिळते, असं ठाकूर यांनी यावेळी सांगितलं.

**एआय नैतिक**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात युवकांनी केवळ व्यावसायिक यशावर लक्ष केंद्रित न करता भारतीय मूल्ये, नैतिकता, करुणा आणि जबाबदारीची जाणीव जपत नेतृत्व करावे, असे आवाहन राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी केले. ते आज पुण्यातील लवळे येथील सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठात आयोजित आंतरराष्ट्रीय विद्यार्थी पदवीदान समारंभ-2026 मध्ये बोलत होते. तुमच्या प्रत्येक कृतीत नैतिकता, करुणा आणि प्रामाणिकपणा असणे गरजेचे आहे, असंही राज्यपाल यावेळी म्हणाले. या कार्यक्रमात बोलताना फ्रांसचे महावाणिज्यदूत पॅट्रिक लेव्हेरिनो यांनी भारत-फ्रान्स सहकार्य, शिक्षण, संशोधन आणि नवोपक्रम क्षेत्रातील वाढती भागीदारी अधोरेखित केली. 2026 हे ‘भारत-फ्रान्स नवोपक्रम वर्ष’ म्हणून साजरे होत असल्याचे त्यांनी सांगितले. सिम्बायोसिसचे संस्थापक प्रा.डॉ.एस.बी.मुजुमदार यांनी ‘वसुधैव कुटुंबकम्’ या तत्त्वज्ञानावर आधारित शिक्षण संस्थेच्या भूमिकेवर प्रकाश टाकला.

**टीईटी पेपरफुटी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत उद्या होणारी टीईटी अर्थात शिक्षक पात्रता परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतला आहे. प्रश्नपत्रिकेबाबत गैरप्रकार झाल्याच्या संशयावरून हा निर्णय घेण्यात आला आहे. आज पहाटे गोपनीय माहितीच्या आधारे भिवंडी येथे काही व्यक्तींकडे टीईटी प्रश्नपत्रिका असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार भिवंडी पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापा टाकून कारवाई केली. या प्रकरणी भिवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून; चौकशी पूर्ण झाल्यानंतर नव्या परीक्षेची तारीख जाहीर करण्यात येणार असल्याचे परिषदेने स्पष्ट केले आहे. या परीक्षेसाठी यंदा 4 लाख 28 हजार 122 परीक्षार्थी बसले होते. यामध्ये पुण्यातून सर्वाधिक 45 हजार 562 परीक्षार्थी आहेत.

दरम्यान पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे. या घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई न केल्यास काँग्रेस रस्त्यावर उतरेल असा इशारा सपकाळ यांनी दिला आहे . शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनीदेखील वारंवार होणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांमुळे राज्यातील तरुणांचे भविष्य धोक्यात आल्याचा आरोप केला.

**कर्जमुक्ती**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देतानाच शासनाने दीर्घकालीन आर्थिक स्थैर्यासाठी नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन दिले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशनअंतर्गत २०२ शेतकरी गट, ९ हजार हेक्टर क्षेत्र आणि १७ शेतकरी उत्पादक कंपन्यांमार्फत हा उपक्रम राबविण्यात येत आहे. ३ कोटी रुपयांपेक्षा अधिक अनुदानातून प्रशिक्षण, प्रात्यक्षिके आणि सेंद्रिय निविष्ठा निर्मितीस चालना दिली जात आहे. नैसर्गिक शेतीमुळे उत्पादन खर्च कमी होऊन मातीचे आरोग्य सुधारते, पर्यावरणाचे संवर्धन होते आणि शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्नासह सुरक्षित अन्नधान्य उत्पादनाला प्रोत्साहन मिळत असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे.

**<u>दाखले</u>**

पुणे महापालिकेतील जन्म आणि मृत्यू दाखल्यांमधील दुरुस्तीची कामे महिनाभरापासून ठप्प असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत नागरिकांच्या तक्रारी ऐकून त्यांचे मार्गदर्शन करण्यासाठी विशेष अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच सॉफ्टवेअरमधील तांत्रिक अडचणी दूर करून प्रलंबित अर्जांचा तातडीने निपटारा करण्यात येणार असल्याची माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली आहे.

**<u>पाणीसाठा</u>**

राज्यातील मोठे, मध्यम आणि लघु अशा सर्व धरणांमध्ये आज सकाळपर्यंत सरासरी २२ पूर्णांक ७३ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. गेल्या वर्षी याच दिवशी हा साठा ४२ पूर्णांक १६ टक्के होता. महसूल विभागनिहाय अमरावती विभागात सर्वाधिक ३८ पूर्णांक ११ टक्के , नागपूर विभागात ३० पूर्णांक ५७ टक्के, कोकण विभागात २७ पूर्णांक ७२ टक्के, नाशिक विभागात २४ पूर्णांक ८४ टक्के, छत्रपती संभाजीनगर विभागात २४ पूर्णांक  ५२ टक्के आणि पुणे विभागात सर्वात कमी १३ पूर्णांक ४६ टक्के उपयुक्त पाणीसाठा नोंदविण्यात आला आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज आकाश अंशतः ढगाळ असून पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या. तर येत्या आठवड्यात राज्यभरात सर्वत्र कमी अधिक प्रमाणात पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**